॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# जनसंपर्क विभाग

बातमी क्रं १

जळगाव, दि. ३०(प्रतिनिधी) — कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाअंतर्गत एम.एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण अंतर्गत ऑन-जॉब ट्रेनिंग (OJT) योजनेंतर्गत औद्योगिक प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव, आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख आणि कौशल्यविकास या उद्देशाने विद्यापीठाने नामांकित उद्योगांशी समन्वय साधला आहे.या उपक्रमाअंतर्गत नाशिक येथील रिषभ इन्स्ट्रुमेंट्स लिमिटेडमध्ये १५ विद्यार्थ्यांची, तर जळगाव येथील मास-टेक कंट्रोल्स प्रा. लि.मध्ये ४ विद्यार्थ्यांची अशा एकूण १९ विद्यार्थ्यांची औद्योगिक प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. औद्योगिक ऑटोमेशन, ऊर्जा कार्यक्षमता आणि अचूक मोजमाप क्षेत्रात कार्यरत असलेल्या या कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांना आधुनिक औद्योगिक तंत्रज्ञान, गुणवत्ता नियंत्रण, अत्याधुनिक उपकरणांचा वापर आणि व्यावसायिक कार्यपद्धतीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.रिषभ इन्स्ट्रुमेंट्स लिमिटेडच्या मानव संसाधन विभागाच्या एचआर करिश्मा खैरनार यांनी विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी आवश्यक सहकार्याची भूमिका घेतली. तसेच मास-टेक कंट्रोल्स प्रा. लि.चे संचालक श्री. चौधरी यांनी उद्योग-विद्यापीठ सहकार्याला प्रोत्साहन देत विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली, तर श्री. भारंबे यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअरसाठी शुभेच्छा दिल्या.विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव त्यांच्या करिअरसाठी महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. व्ही. पी. पाटील, स्कूल ऑफ फिजीकल सायन्सेसचे संचालक प्रा. जे. व्ही. साळी, विभागप्रमुख डॉ. एस. एस. घोष, इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख डॉ. डी. जे. शिराळे, डॉ. पी. जी. चव्हाण, डॉ. जसपाल बंगे आणि डॉ. राहुल साळुंखे यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

बातमी क्रं २

जळगाव, दि. ३० जून (प्रतिनिधी) : संगणक क्षेत्रातील गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने 'प्रोग्रामर ऑफ द फ्युचर' शिष्यवृत्ती उपक्रमाला या शैक्षणिक वर्षापासून प्रारंभ झाला असून, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेत शिष्यवृत्तीची निवड प्रक्रिया आणि वितरण समारंभ उत्साहात पार पडला. प्रवीण देशमुख चॅरिटेबल ट्रस्टतर्फे राबविण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत एम.सी.ए., एम.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) आणि एम.एस्सी. (इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) या अभ्यासक्रमांतील प्रत्येकी एका विद्यार्थ्याला १० हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.स्वर्गीय प्रवीण देशमुख हे संगणकशास्त्र प्रशाळेच्या एम.सी.ए. अभ्यासक्रमाचे सन १९९७ ते २००० या बॅचचे विद्यार्थी होते. त्यांचे सन २००५ मध्ये अपघाती निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांच्या वर्गमित्रांनी 'प्रवीण देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट'ची स्थापना केली. ट्रस्टने विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेसोबत सामंजस्य करार करून सन २०२५-२६ पासून 'प्रोग्रामर ऑफ द फ्युचर' शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे.

या शिष्यवृत्तीचा उद्देश गुणवंत व आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे हा आहे. योजनेनुसार एम.सी.ए., एम.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) आणि एम.एस्सी. (इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) या अंतिम वर्षातील प्रत्येकी एका विद्यार्थ्याला वार्षिक शिक्षण शुल्कासाठी १० हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी निवड प्रक्रिया २० जून २०२६ रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत संगणकशास्त्र प्रशाळेत पार पडली. एकूण ५९ विद्यार्थ्यांनी सीबीटी परीक्षेसाठी पात्रता मिळवली होती. संगणक प्रयोगशाळेत ही परीक्षा अत्यंत पारदर्शक व गुणवत्ताधारित पद्धतीने घेण्यात आली. परीक्षेसाठी ट्रस्टचे सदस्य प्रवीण धार्मिक, प्रवीण बर्वे, संदीप गावंडे, महेश साळुंखे, नितीन चौधरी, प्रकाश राठोड, ओम बारकरे, ट्रस्टचे सचिव हिमांशू सिंग आणि अध्यक्ष माधव चौधरी उपस्थित होते.

## जनसंपर्क विभाग

सीबीटी परीक्षेतील अव्वल नऊ विद्यार्थ्यांची दुसऱ्या फेरीसाठी निवड करण्यात आली. तज्ज्ञ समितीच्या मुलाखतीनंतर अंतिम तीन विद्यार्थ्यांची निवड जाहीर करण्यात आली. एम.सी.ए. अभ्यासक्रमातून विशाल सोनोने, एम.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) मधून बारी पंकज रामचंद्र आणि एम.एस्सी. (इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) मधून कु. निर्मल पाटील यांची 'प्रोग्रामर ऑफ द फ्युचर' शिष्यवृत्तीसाठी निवड झाली.शिष्यवृत्ती वितरण समारंभ सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. आर. जे. रामटेके होते. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता प्रा. अनिल पृथ्वीराज डोंगरे उपस्थित होते. व्यासपीठावर ट्रस्टचे अध्यक्ष माधव चौधरी, सचिव हिमांशू सिंग तसेच वरिष्ठ प्राध्यापक एस. आर. कोल्हे उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी १० हजार रुपयांचा धनादेश, प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विनीत काकडे यांनी केले. सीबीटी परीक्षेच्या यशस्वी आयोजनासाठी तांत्रिक समितीतील डॉ. राजू आमले, डॉ. विनीत काकडे, डॉ. गिरीश चाटे, डॉ. घनश्याम रामटेके, राहुल माकोडे आणि राहुल अटाळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

बातमी क्रं ३

जळगाव दि. ३० जून (प्रतिनिधी)  :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील एक सहायक कुलसचिव, एक कक्ष अधिकारी व एक कनिष्ठ अभियंता आज विद्यापीठ सेवेतून नियत वयोमानानुसार निवृत्त झाले.

विद्यापीठाच्या परीक्षा विभागात कार्यरत असलेले सहायक कुलसचिव अनिल शालिग्राम पाटील, परीक्षा विभागातील कक्ष अधिकारी अजय बाळकृष्ण घोलप व बांधकाम विभागात कार्यरत असलेले कनिष्ठ अभियंता बाळकृष्ण देवराम पाटील हे नियत वयोमानानुसार विद्यापीठाच्या सेवेतून सेवा निवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचारी यांना कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, परीक्षा मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत निरोप देण्यात आला. सत्कारार्थी यावेळी सहकुटूंब उपस्थित होते. यावेळी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी संघटना, मागासवर्गीय कर्मचारी संघटना व उमवि पतपेढीच्या वतीने सेवानिवृत्त होत असलेल्या कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ३० जुन, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी